दिवाळी पाडवा व बलिप्रतिप्रदेच्या मंगलमय शुभेच्छा

॥ वर्ष - 8 ।अंक -114 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 2 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**महाईन्यूज**

दिवाळी पाडवा व बलिप्रतिप्रदेच्या निमित्ताने महाईन्युज कार्यालयाला सुटी असल्यामुळे **रविवार दि. ३ नोव्हेंबर २०२४** रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. संबंधितांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचा विश्वास

# मागासवर्गीय समाज महेशदादांच्या पाठीशी!

## मिशन विधानसभा : संविधान भवन उभारणीमुळे शहराचा लौकीक

**। मुंबई । महाईन्यूज**

**भोसरी, पिंपरी चिंचवड मधील मागासवर्गीय जनतेसाठी विविध प्रकारच्या प्रभावी विकास योजना आणि प्रकल्प राबविण्याचा भविष्यात प्रयत्न असेल अशी ग्वाही भोसरी मतदारसंघातील भाजप, शिवसेना, आरपीआय आठवले महायुतीचे उमेदवार आमदार महेश लांडगे यांनी दिली.भोसरी विधान सभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांचे हात बळकट करण्यासाठी भोसरी विधानसभेतील मातंग तथा मागासवर्गीय प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक नुकतीच पार पडली.**



यावेळी आमदार अमित गोरखे, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब अडागळे, संदीपान झोंबाडे, बापू घोलप, डॉ. धनंजय भिसे, नितीन घोलप, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, कीर्ती जाधव, मारुती जाधव, अरुण जोगदंड, युवराज दाखले तसेच भोसरी विधानसभा मतदारसंघातील ४०० पेक्षा जास्त मागासवर्गीय प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी आमदार अमित गोरखे म्हणाले की, आमदार महेश लांडगे यांनी केलेले भोसरी विधान सभेतील कार्य अतुलनीय आहे. मी आमदार होत असताना त्यांनी मला केलेले हक्काने मतदान हे समाज कधीही विसरणार नाही, आज भोसरी विधानसभेमध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठे असे संविधान भवन त्यांनी उभे करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मोठी मानवंदना दिलेली आहे, ते स्वतः स्थायी समितीचे अध्यक्ष असताना निगडी येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा बांधण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे. त्याचबरोबर दरवर्षी अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सवाला मनपाकडून मोठे अनुदान देण्याचे कामही ते करीत आहेत. त्यांच्या मतदारसंघातील अनेक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांनी आरटीई च्या माध्यमातून मोफत प्रवेश मिळवून दिलेले आहेत, भोसरी मतदारसंघात मागासवर्गीयांसाठी घरे उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे.

पंतप्रधान आवास योजना, घरकुल योजना, एसआरए प्रकल्प येथे हक्काचे घर मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. तसेच महायुतीच्या माध्यमातून मातंग तथा मागासवर्गीय समाजाला नुकतेच घरकुल बांधणीचे अनुदान दीड लाख हुन अडीच लाखापर्यंत करण्यात आले. त्याच बरोबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन मधील निवासस्थान, पुण्यातील लहुजी वस्ताद साळवे यांचे स्मारक, बार्टीच्या धरती वर आर.टी. ची निर्मिती असेल अण्णाभाऊ साठे यांचे मुंबईतील स्मारक असेल अशा अनेक चांगल्या गोष्टी महायुती सरकारने केलेल्या आहेत.

### मागासवर्गीयांसाठी घरे उपलब्ध

संपूर्ण मागासवर्गीय समाज महायुतीचे उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या सोबतअसेल, व त्यांच्या विजयात भोसरी तील मागासवर्गीय जनतेचा मोठा वाटा असेल असे आमदार गोरखे म्हणाले.आमदार महेश लांडगे यांनी येणाऱ्या काळामध्ये भोसरीतील मागासवर्गीय जनतेसाठी अनेक योजना आणण्याचा प्रयत्न असेल असे सांगितले त्याचबरोबर त्यांनी आज पर्यंत केलेल्या कामांचा लेखाजोखा समोर मांडला. कार्यक्रमाचे आयोजन मारुती जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन अरुण जोगदंड यांनी केले. आभार युवराज दाखले यांनी मानले.जनतेसाठी विविध प्रकारच्या प्रभावी विकास योजना आणि प्रकल्प राबविण्याचा भविष्यात प्रयत्न असेल अशी ग्वाही भोसरी मतदारसंघातील भाजप, शिवसेना, आरपीआय आठवले महायुतीचे उमेदवार आमदार महेश लांडगे यांनी दिली.

## महायुतीच्या पदाधिकाऱ्यांकडून प्रचारात जोरदार आघाडी

## रावेतमध्ये महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ घोंगडी बैठका

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप – शिवसेना – राष्ट्रवादी काँग्रेस – आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ रावेत प्रभागातील भाजप आणि महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने घोंगडी बैठका आणि कोपरा सभांचा धडाका लावत प्रचारात आघाडी घेतली आहे.भारतीय जनता पक्षाने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या पहिल्या यादीत शंकर जगताप यांचे नाव जाहीर होताच महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार प्रचार करत उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वीच रावेतमधील प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण केला आहे.रावेतमधील नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत महायुतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या घोंगडी बैठका आणि कोपरा सभांना स्वयंस्फूर्तीने हजेरी लावली. आणि रावेत गावच्या सर्वांगीण विकासासाठी महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनाच मतदान करण्याचा संकल्प केला.



वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी शंकर जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच रावेतमधील १८ मीटर डीपी रस्त्यांचा विषय मार्गी लागला.

### अजित पवार यांच्या हस्ते शुभारंभ

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या कामांचा शुभारंभही करण्यात आला. त्याबद्दल रावेतमधील सर्व सोसायटीधारक आणि नागरिकांनी जगताप यांचे आभार व्यक्त करत यापुढेही रावेतच्या शाश्वत विकासासाठी त्यांनाच मतदान करू, असा निर्धारही त्यांनी केला. गाडे, पोपट भोंडवे, युवा नेते दीपक भोंडवे, सुरेश भोंडवे, कुणाल भोंडवे, अजय भोंडवे, श्रीकांत भोंडवे, किरण भोंडवे, सुनील भोंडवे यांनी केले होते.

# शहरात 31 ठिकाणी आगीच्या घटना

## अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे गंभीर घटना टळल्या

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शुक्रवारी सायंकाळी शहरातील वेगवेगळ्या भागात ३१ ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे गंभीर घटना टळल्या, तसेच सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शहर, तसेच उपनगरात मोठ्या प्रमाणावर आतषबाजी करण्यात येते.**



लक्ष्मीपूजनानंतर सायंकाळी सात ते रात्री नऊ यावेळेत शहरात ३१ ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. अग्निशमन दलाच्या जवानांच्या तत्परतेमुळे गंभीर घटना टळल्या. सुदैवाने आगीच्या घटनांमध्ये कोणी गंभीर जखमी झाले नाही, अशी माहिती अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.आळंदी रस्त्यावरील कळस गावात कचऱ्यावर पेटता फटका पडल्याने आग लागण्याची घटना सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली. मांजरीतील मोरे वस्ती परिसरात उसाच्या शेतात फटाका पडल्याने आग लागली. या घटनेची माहिती मिळताच हडपसर अग्निशमन दलाच्या केंद्रातील बंब घटनास्थळी दाखल झाला. जवानांनी पाण्याचा मारा करनु आग आटोक्यात आणली. बालेवाडीतील काका हलवाई मिठाई दुकानासमोर पेटता फटका पडल्याने महावितरणच्या विद्युत तारेने पेट घेतला. कोथरुड येथील रामबाग कॉलनीत पेटता फटका पडल्याने झाडाने पेट घेतला.मार्केट यार्डातील प्रवेशद्वार क्रमांक पाच परिसरात लावलेल्या वाहनातील कचऱ्याने पेट घेतला. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. सहकारनगर पोलीस चौकीजवळ एका नारळाच्या झाडाला आग लागली. बंडगार्डन रस्ता परिसरातील मंगलदास चौकीजवळ एका झाडाला आग लागली. गणेश पेठेतील बुरुड आळीत ताडीपत्रीवर पेटता फटका पडल्याने आग लागली. रविवार पेठेतील तांबोळी मशिदीजवळ कपड्याच्या दुकानात फटाक्याची ठिणगी उडून आग लागली. घोरपडीतील बी. टी. कवडे रस्त्यावर रस्त्याचा कडेला लावलेल्या ट्रकवर पेटता फटका पडल्याने आग लागली. लक्ष्मी रस्त्यावरील विजय चित्रपटगृहाजवळ एका घराच्या छतावर पेटता फटका पडल्याने आग लागली. टिळक रस्त्यावर महाराष्ट्र मंडळाजवळ एका झाडाला आग लागली, तसेच आळंदी रस्त्यावरील कळस स्मशानभूमीजवळ असलेल्या शेतात फटाक्यांमुळे आग लागली. कात्रजमधील संतोषनगर परिसरात एका घराच्या गॅलरीत पेटत्या फटाक्यामुळे आग लागली. लक्ष्मीपूजनानंतर सायंकाळी सात ते रात्री नऊ यावेळेत शहरात ३१ ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. अग्निशमन दलाच्या जवानांच्या तत्परतेमुळे गंभीर घटना टळल्या. सुदैवाने आगीच्या घटनांमध्ये कोणी गंभीर जखमी झाले नाही, अशी माहिती अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.आळंदी रस्त्यावरील कळस गावात कचऱ्यावर पेटता फटका पडल्याने आग लागण्याची घटना सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली.

### एका झाडाला आग लागली

मांजरीतील मोरे वस्ती परिसरात उसाच्या शेतात फटाका पडल्याने आग लागली. या घटनेची माहिती मिळताच हडपसर अग्निशमन दलाच्या केंद्रातील बंब घटनास्थळी दाखल झाला. जवानांनी पाण्याचा मारा करनु आग आटोक्यात आणली. बालेवाडीतील काका हलवाई मिठाई दुकानासमोर पेटता फटका पडल्याने महावितरणच्या विद्युत तारेने पेट घेतला. कोथरुड येथील रामबाग कॉलनीत पेटता फटका पडल्याने झाडाने पेट घेतला.मार्केट यार्डातील प्रवेशद्वार क्रमांक पाच परिसरात लावलेल्या वाहनातील कचऱ्याने पेट घेतला. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. सहकारनगर पोलीस चौकीजवळ एका नारळाच्या झाडाला आग लागली. बंडगार्डन रस्ता परिसरातील मंगलदास चौकीजवळ एका झाडाला आग लागली. गणेश पेठेतील बुरुड आळीत ताडीपत्रीवर पेटता फटका पडल्याने आग लागली. ट्रकवर पेटता फटका पडल्याने आग लागली. लक्ष्मी रस्त्यावरील विजय चित्रपटगृहाजवळ एका घराच्या छतावर पेटता फटका पडल्याने आग लागली.

# जुन्या इमारतींचा रखडलेला पुनर्विकासाचा प्रश्न

## अरुंद रस्त्यांमुळे कॅम्प भागात होत असलेली वाहतुकीची कोंडी

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**रस्त्यांची दुरवस्था, कॅन्टोन्मेंट भागातील जुन्या इमारतींचा रखडलेला पुनर्विकासाचा प्रश्न, अरुंद रस्त्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी अशा समस्या पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना भेडसावत आहेत.**



वारंवार पाठपुरावा केल्यानंतरही त्यावर तोडगा निघत नसल्याने या भागातील नागरिकांमध्ये नाराजी आहे. या मतदारसंघातील काही भागांत मोठ्या झोपडपट्ट्या असून, काही भाग उच्चभ्रूंचा आहे. ताडीवाला रस्ता, मंगळवार पेठ, सोमवार पेठ, कोरेगाव पार्क, डायस प्लॉट, काशेवाडी, हरकानगर, मोदी खाना, भीमपुरा, कॅम्प परिसर, सोलापूर बाजार, गुलटेकडी, घोरपडी, वानवडी, तसेच बी. टी. कवडे रस्त्याचा काही भाग कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात येतो. रोजंदारीवर काम करणारे, मध्यमवर्गीय याचबरोबर व्यावसायिक, उद्योजक, तसेच वरिष्ठ पातळीवर काम करणारे अधिकारीही या मतदारसंघातील कोरगाव पार्क परिसरात राहतात.कटक मंडळांचा (कॅन्टोन्मेंट बोर्ड) समावेश महापालिकेच्या हद्दीत करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला. मात्र अद्यापही त्यावर शिक्कामोर्तब न झाल्याने हा भाग पालिकेच्या हद्दीत कधी जाणार, हे स्पष्ट झालेले नाही. कटक मंडळाच्या हद्दीत अनेक जुन्या इमारती असून, अनेक इमारती मोडकळीस आल्याने अक्षरशः धोकादायक बनलेल्या आहेत. मात्र, त्याचा पुनर्विकास करायचा झाल्यास त्यासाठी संरक्षण खात्याची मान्याता लागते. ही प्रक्रिया अत्यंत किचकट असल्याने गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबितच राहिलेला आहेसांडपाणी वाहिन्या, रस्त्यांची दुरवस्था, अरुंद रस्त्यांमुळे कॅम्प भागात होत असलेली वाहतुकीची कोंडी, याबरोबरच अपुरी पार्किंग व्यवस्था असे प्रश्न आहेत.

### अनेक इमारती धोकादायक बनलेल्या

या मतदारसंघात सर्वधर्मीय नागरिक आहेत. मुस्लीम, दलित, ख्रिश्चन समाजाचे लक्षणीय मतदार या मतदारसंघात आहेत. एका बाजूला उच्चभ्रूंची लोकवस्ती तर एका बाजूला झोपडपट्टीत येणारा भाग, असे चित्र येथे पाहायला मिळते. कटक मंडळ सदस्यांची निवडणूक रखडल्याने पाठपुरावा करायचा, तर कोणाकडे, असा प्रश्न येथील नागरिकांकडून विचारला जात आहे.रोजंदारीवर काम करणारे, मध्यमवर्गीय याचबरोबर व्यावसायिक, उद्योजक, तसेच वरिष्ठ पातळीवर काम करणारे अधिकारीही या मतदारसंघातील कोरगाव पार्क परिसरात राहतात. कटक मंडळाच्या हद्दीत अनेक जुन्या इमारती असून, अनेक इमारती मोडकळीस आल्याने अक्षरशः धोकादायक बनलेल्या आहेत.

## पुनावळेतील सोसायटीधारकांचा जगताप यांना एकदिलाने पाठींबा

# शंकर जगतापच आमदार हवेत!

### मविआ सरकारच्या काळात विकासकामांना ब्रेक : शंकर जगताप

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्या पद्धतीचा विकास शहरातील पिंपळे गुरव, सांगवी, पिंपळे सौदागर, वाकड या गावांचा झालेला आहे. तसा विकास अद्यापही पुनावळे गावचा झालेला नाही. मात्र आमची सर्वात मोठी कचरा डेपोची समस्या आमदार अश्विनी जगताप यांनी सोडविली. आणि त्यासाठी शंकर जगताप यांनीही ज्याप्रकारे नियोजनबद्ध पाठपुरावा केला. त्याच प्रयत्नांचे यश म्हणून आमच्या पुनावळेकरांच्या डोक्यावरून कचरा डेपोचे भूत उतरले. असाच यापुढेही आमच्या पुनावळे गावचा स्मार्ट विकास करण्यासाठी स्मार्ट व्हिजन असणारे महायुतीचे शंकर जगताप हेच या भागाचे आमदार असावेत आणि त्यासाठी आम्ही पुनावळेतील सर्व सोसायटी धारक एकदिलाने जगताप यांच्या पाठीशी उभे आहेत, असे आश्वासन पुनावळे गावातील सोसायटी धारकांनी दिले.**



भाजप – शिवसेना – राष्ट्रवादी काँग्रेस – आरपीआय (आठवले) मित्रपक्षाचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ पुनावळे येथील सोसायट्यांमध्ये झंझावाती दौरा करण्यात आला. या प्रचार दौऱ्यात जगताप यांनी पुनावळेमधील एंफीनिटी टॉवर सोसायटी, साईप्रस सोसायटी, पुणे विले सोसायटी, रुद्राक्ष सोसायटी, डी.एस.के सोसायटी, व्ही. जे. जावडेकर सोसायटी, साईब्लिस्ट सोसायटी, मालपाणी सोसायटी, गोल्डन ट्रेजर सोसायटी, द प्रोव्हीन्स सोसायटी, संटोसा प्राईड सोसायटी, सिरिको ग्रँड सोसायटी, 7 प्लमेरिया सोसायटी सर्व सोसायट्यांना भेट देऊन तेथील रहिवाशांसोबत संवाद साधत त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. यावेळी सोयायटीधारकांनी जगताप यांचे जोरदार स्वागत केले. यावेळी झालेल्या बैठकीमध्ये सोसायटीधारकांनी त्यांना येणाऱ्या दैनंदिन समस्या जगताप यांना सांगितल्या. विशेषतः चांगले रस्ते, मुबलक पाणी, प्रदूषण मुक्त परिसर, सुसज्ज उद्यान, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, नाट्यगृह या सुविधांचा अभाव असल्याची तक्रार सोसायटीधारकांनी यावेळी केल्या.

ज्या पद्धतीने आमदार अश्विनी जगताप आणि तुमच्या पाठपुराव्यामुळे येथील सर्वात गहन कचरा डेपोचा प्रश्न मार्गी लागला, त्याबद्दल पुनावळे गावातील प्रत्येक नागरिक तुमचा आभारी आहे. आणि यापुढेही पुनावळे गावातील सर्व समस्या सोडवून गावाचा स्मार्ट विकास करण्यासाठी पुनावळे गावातील आम्ही सर्व सोसायटीधारक एकदिलाने आणि एकजुटीने तुमच्यासोबत आहोत, असा विश्वास उपस्थित सर्व सोसायटीधारकांनी जगताप यांना दिला.

दरम्यान, जगताप यांनी बोलताना सांगितले की, केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने पिंपरी चिंचवड शहराच्या विकासासाठी अनेक चांगले प्रकल्प राबविले आहेत मात्र महायुतीचे सरकार सत्तेत येताच विकासकामांना गती मिळाली. त्यामुळे या निवडणुकीत विकासकांना ब्रेक लावणाऱ्यांना घरी बसवून विकासकामांना गती देणारे महायुती सरकार पुन्हा सत्तेत आणायचे आहे. तसेच येणाऱ्या काळात पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, सांगवी, वाकड या भागात ज्याप्रमाणे मोठे उद्यान, कलाप्रेमींसाठी नाट्यगृह, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, लहान मुलांसाठी सुसज्ज खेळाचे मैदान, वाहतुकीसाठी सुसज्ज चांगले रस्ते, पदपथ, यांसारख्या सुविधा आहेत अगदी तशाच किंबहुना त्यापेक्षाही अधिक स्मार्ट विकासकामे पुनावळे भागात होतील असे आश्वासन जगताप यांनी सोसायटीधारकांना दिले. यावेळी प्रशांत संत व सदस्य, बाजीराव बहिरट, शुभम भुजबळ, दिलीप तापकीर, संतोष मांदळे, दादा ढवळे, किरण बोरगे यांच्यासह विविध सोसायटीमधील रहिवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### अनेक चांगले प्रकल्प राबविले

नागरिक तुमचा आभारी आहे. आणि यापुढेही पुनावळे गावातील सर्व समस्या सोडवून गावाचा स्मार्ट विकास करण्यासाठी पुनावळे गावातील आम्ही सर्व सोसायटीधारक एकदिलाने आणि एकजुटीने तुमच्यासोबत आहोत, असा विश्वास उपस्थित सर्व सोसायटीधारकांनी जगताप यांना दिला. दरम्यान, जगताप यांनी बोलताना सांगितले की, केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने पिंपरी चिंचवड शहराच्या विकासासाठी अनेक चांगले प्रकल्प राबविले आहेत.

#### एकदिलाने -एकजुटीने तुमच्यासोबत

पुनावळे गावातील सर्व समस्या सोडवून गावाचा स्मार्ट विकास करण्यासाठी पुनावळे गावातील आम्ही सर्व सोसायटीधारक एकदिलाने आणि एकजुटीने तुमच्यासोबत आहोत, असा विश्वास उपस्थित सर्व सोसायटीधारकांनी जगताप यांना दिला. दरम्यान, जगताप यांनी बोलताना सांगितले की, केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने पिंपरी चिंचवड शहराच्या विकासासाठी अनेक चांगले प्रकल्प राबविले आहेत.

---

## दिघीतील माजी सैनिकांच्या भावना : हाउ इज द जोश? ... 'हाई सर..!'

### दिघीचा कायापालट केला म्हणून आमदार महेश लांडगे यांना साथ

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**तन-मन धन अर्पण करत आपण देशाची सेवा बजावली. त्याचाच आदर्श डोळ्यासमोर ठेऊन या शहराला देखील सुजलाम् – सुफलाम् करणार आहे. शहर विकासाचे 'व्हिजन' डोळ्यासमोर ठेवताना माजी सैनिकांचा आदर्श मी समोर ठेवतो, असे आवाहन भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केले.**




देशसेवेसाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या या शूरांचा 'माजी सैनिक मेळावा' दिघी येथे पार पडला. यावेळी माजी सैनिक विकास संघ दिघी अध्यक्ष नरेंद्र सिंह चौहान, माजी सैनिक पतसंस्थेचे अध्यक्ष आमसिद्ध भिसे, माजी नगरसेवक विकास डोळस, कमांडर नंदा, कॅप्टन सावंत, परिसरातील आजी-माजी सैनिक तसेच त्यांचे परिवारातील सदस्य उपस्थित होते. सुमारे पाचशेहून अधिक यावेळी माजी सैनिकांची उपस्थिती होती. यावेळी माजी सैनिकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. माजी सैनिक म्हणून आम्हाला मिळणारा सन्मान , आम्ही ज्या ठिकाणी वास्तव्याला आहोत, त्या दिघी परिसराचा केलेला कायापालट आणि आमच्या बाबत नेहमीच आस्थेवाइकपणाने होणारी विचारपुस या सर्व गोष्टींमुळे आम्ही नेहमीच आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी आहोत. त्यामुळे आम्हाला जर कोणी आमदार महेश लांडगे यांच्याबाबत "हाऊ इज द जोश..?" असे विचारले तर "हाई सर" एवढेच आमच्याकडून सांगितले जाते, असेही माजी सैनिक म्हणाले.

> देव-देश आणि धर्मासाठी पुढाकार घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीसाठी नतमस्तक व्हावे ही माझी भूमिका आहे. माजी सैनिकांनी देशासाठी केलेल्या कामाची कुणाशीच तुलना होऊ शकत नाही. दिघीगाव आणि भारतमातेचे सुपुत्र ज्यांच्या त्याग, शौर्य आणि राष्ट्रभक्तीचा संबंध देशवासियांना सार्थ अभिमान आहे. देशसेवेसोबतच लोकशाही बळकट व्हावी याकरिता संबंध सैनिक बांधवांनी मला पाठिंबा दर्शवित शुभाशीर्वाद दिले याबद्दल त्यांचा हा आजन्म ऋणी आहे.
>
> – **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा पिंपरी-चिंचवड.



# भूमिका

**संघराज्यीय पद्धतीत केंद्र व राज्यांचे अधिकार व कोणते विषय कोणाच्या अखत्यारीत याची घटनेच्या सातव्या परिशिष्टात स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. काही विषय हे केंद्र व राज्य या दोघांच्या यादीत समाविष्ट होतात. पोलीस, आरोग्य, स्थानिक स्वराज्य संस्था असे काही विषय राज्यांच्या यादीत समाविष्ट आहेत.**

## हा अट्टहास कशासाठी?



केंद्र व राज्य या दोघांच्या यादीत समाविष्ट असलेल्या विषयांच्या धोरणात्मक विषयांवरून अनेकदा केंद्र व राज्यांमध्ये मतभेद होतात. केंद्र व बिगर भाजपशासित राज्यांमध्ये सध्या विविध विषयांवरून धुसफूस सुरू असतानाच 'आयुष्मान भारत जनआरोग्य या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनेवरून केंद्रातील सत्ताधारी भाजप आणि दिल्लीतील आम आदमी पार्टी तसेच पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसमध्ये वाद उद्भवला आहे. ७० वर्षे आणि त्यावरील नागरिकांना वर्षाला पाच लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य सेवा पुरविण्याच्या आयुष्मान भारत जनआरोग्य योजनेत दिल्ली आणि पश्चिम बंगाल ही बिगर भाजपशासित राज्ये सहभागी झालेली नसल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दोन राज्यांवर आगपाखड केली. केंद्राच्या या योजनेचा दोन राज्यांमधील ७० वर्षांवरील नागरिकांना लाभ मिळत नसल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. आरोग्य सेवेचे महत्त्व करोनाच्या साथीनंतर साऱ्या जगाला समजले. आरोग्य सेवा सध्या एवढी महाग झाली आहे की ती सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेरची आहे. अशा नागरिकांना शासकीय रुग्णालयांमध्ये सेवा घेण्याशिवाय पर्याय नसतो. शासकीय रुग्णालयांची अवस्था तर पार बिकट. पायाभूत सुविधांची आबाळ, त्यातच डॉक्टरांची अपुरी संख्या यामुळे शासकीय यंत्रणेवर बोजा पडतो. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार व विविध राज्य सरकारांनी नागरिकांना मोफत आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सुरू केलेल्या योजना अधिक फलदायी कशा ठरतील या दृष्टीने नियोजन होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी आयुष्मान भारत योजना दिल्ली व पश्चिम बंगाल ही दोन राज्ये राबवीत नसल्याबद्दल मोदी यांनी टीका केली असली तरी या दोन्ही राज्य सरकारांनी राज्यांमार्फत राबविण्यात येणारी आरोग्य योजना अधिक फायदेशीर असल्याचा दावा केला आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि 'आप'चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली सरकार प्रत्येक नागरिकाला एक कोटी रुपयांपर्यंत मोफत आरोग्य सेवा पुरवीत असल्याचे स्पष्ट करीत आयुष्मान योजनेपेक्षा दिल्ली सरकारची योजना अधिक प्रभावी, असल्याचा दावा केला. तसेच केंद्राच्या योजनेत रुग्णालयात दाखल झाले तरच पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत आहेत. याउलट दिल्ली सरकारच्या आरोग्य निधी योजनेत सर्व उपचार मोफत केले जातात, असा युक्तिवाद करीत दिल्ली सरकारची योजना देशभर राबवावी, असा सल्ला केजरीवाल यांनी दिला. पश्चिम बंगाल सरकारची 'स्वास्थो साथी' योजना आयुष्मानपेक्षा चांगली असल्याचा दावा सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने केला आहे. पंतप्रधानांनी या योजनेत सहभागी होत नसल्याबद्दल टीका केली असली तरी 'आप' आणि तृणमूल काँग्रेसने आयुष्मानपेक्षा त्या त्या राज्यांमध्ये राबविण्यात येत असलेल्या योजना अधिक प्रभावी असल्याचा युक्तिवाद केला आहे. आयुष्मान भारत योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटींवर भारताचे नियंत्रक आणि लेखा परीक्षकांनी (कॅग) ओढलेल्या ताशेऱ्यांकडे केजरीवाल यांनी लक्ष वेधले आहे.आरोग्य हा विषय राज्यांच्या अखत्यारीत असताना केंद्राचीच योजना स्वीकारण्याचा अट्टहास का, असा प्रश्न उपस्थित होतो.

करोना साथीनंतर आरोग्य हा विषय केंद्र सरकारच्या यादीत समाविष्ट करण्याची भूमिका १५ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष एन. के. सिंग यांनी मांडली होती. राज्यांना त्यांचा निर्णय घेण्याचा अधिकार असताना केंद्राचीच योजना गळी उतरविण्याचा आग्रह केंद्राकडून धरला जातो हे कितपत योग्य आहे याचाही विचार झाला पाहिजे. एखादी योजना फायदेशीर असल्यास राज्य सरकार ती योजना स्वीकारते. पण केंद्राच्या योजनेत 'पंतप्रधान' असा उल्लेख केला जात असल्याने बिगर भाजपशासित राज्ये या योजनांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात, असे अनुभवास येते.

---

## संपादकीय »

### मँडरिन मिठाई!

***...दोन देशांदरम्यान टोकाच्या मतभेदाच्या मुद्द्यांवर वरकरणी अशक्यप्राय वाटणारी दिलजमाई घडून येते, ही जाणीव गुलाबी थंडीवत सुखद चाहूल देणारीच...***

भारत-चीन सीमेवरील घडामोडी दिवाळीच्या उत्साहात भर घालणाऱ्या आहेत. गेली साडेचार वर्षे या भागांमध्ये केवळ शिव्या-बुक्क्यांची आणि काही वेळेस तर तीक्ष्ण शस्त्रांच्या प्रहारांची देवाण-घेवाण होत होती.

त्याच्या आधी कित्येक वर्षे संशयाच्या आणि तिरस्काराच्या नजरा परस्परांवर फेकल्या जात. या कडवट आणि हिंसक पार्श्वभूमीवर दोन कट्टर शत्रूंमधील बदलते वर्तमान सुखसमाधान प्रसवणारे. एका हिंसक, रक्तलांछित आणि संशयपूर्ण पर्वानंतर बऱ्याच प्रमाणात परस्पर विश्वासातून या विशाल सीमेवर काही स्थैर्यगर्भ, सकारात्मक घडून येत आहे; याबद्दल दोन्ही बाजूंना वाटणारे समाधान स्पष्ट दिसत आहे. या दिलासादायी वाटचालीचे श्रेय अर्थातच दोन्ही देशांच्या सरकारांचे, त्यांच्या मुत्सद्द्यांचे आणि लष्करी कमांडरांचेही.

---

'उठा उठा दिवाळी आली...' ही एका साबणाची जाहिरात अलीकडची; पण दिवाळी म्हणजे सुट्टी असूनही पहाटेपासून जागे असणे हे अगदी आमच्या लहानपणीपासूनचे. रोषणाई, फराळ, भेटीगाठी हे दिवाळीचे वर्णन जसेच्या तसे राहिले असले तरी या सणाचे स्वरूप काळानुसार आणि समाजातील बदलांनुसार खूप पालटले आहे.

## बदलत्या दिवाळीत काय गवसले, काय हरवले?

पारंपरिक दिवाळीचा उत्सव धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वावर आधारित होता, तर आताच्या दिवाळीमध्ये सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक बदलांचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो.पारंपरिक दिवाळीमध्ये कुटुंब, समाज आणि धार्मिक विधी यांना विशेष महत्त्व होते. घरातील स्वच्छता, लिपी पूजन, लक्ष्मी पूजन, रांगोळ्या काढणे, दिवे लावणे आणि फटाके उडवणे यांचा एकत्रित आनंद साजरा होत असे. लोक आपल्या कुटुंबीयांसोबत उत्सव साजरा करत असत. या सणात धार्मिक आणि आध्यात्मिक आयामाला जास्त महत्त्व दिले जात असे.आधुनिक काळात, दिवाळी उत्सवाचे स्वरूप काहीसे बदलत गेले. या बदलांमध्ये मुख्यतः तंत्रज्ञान, जीवनशैली आणि पर्यावरणपूरक विचार यांचा समावेश आहे. त्यामुळे घडलेली फार चांगली गोष्ट अशी की, पूर्वीपेक्षा आता फटाके फोडण्याबाबत लोक जास्त जागरूक झाले आहेत. पर्यावरण आणि ध्वनी प्रदूषणाचा विचार करून अनेक



ठिकाणी फटाक्यांचा वापर कमी झाला आहे. फटाके न फोडता दिवाळी साजरी करण्याची नवीन पद्धत लोकप्रिय होत आहे.आजच्या काळात पर्यावरणाच्या दृष्टीने जागरूकता वाढली आहे. त्यामुळे लोक प्लास्टिकच्या ऐवजी मातीचे दिवे, नैसर्गिक रंगांनी रांगोळ्या आणि पर्यावरणपूरक सजावट वापरतात. एकंदरच 'इको फ्रेंडली' दिवाळी साजरी करण्याकडे कल दिसतो.काही बदल नेमके कुठे नेणार आहेत, असा प्रश्न पडतो. उदाहरणार्थ, आधी बाजारात जाऊन खरेदी करणे ही दिवाळीची एक मोठी परंपरा होती, पण आता ऑनलाइन शॉपिंगचा जमाना आहे. त्यामुळे खरेदी सोपी आणि सुलभ झाली आहे. पूर्वी दुकानात जाऊन कपडे खरेदी करणे एक सोहळा होता कपडे घेऊन शिंप्याकडे शिवायला टाकणे व त्याची वाट पाहण्यात आनंद होता. आता ॲमेझॉनसारखी अनेक खरेदी-उपयोजने घरपोच काहीही पाठवतात. ही उपयोजने त्यांच्या 'सेल'साठी विक्रेत्यांनाही कमी किमतीत माल विकण्याची गळ घालतात. कमी नफाक्षमतेत माल विकला जातो, त्यातून कामगारापर्यंत किती लाभ पोहोचतो याची मोजदाद करण्यासाठी कोणतेही सर्वेक्षण सार्वजनिकरीत्या उपलब्ध नाही; पण यात कामगारांनाही फटका सोसावा लागत असावा. 'ब्रँडेड' कपड्यांची मागणी वाढत गेल्याने गार्मेंट उद्योग फोफावला, त्यानंतर 'ऑनलाइन सेल'मुळे झालेल्या या बदलाकडे पाहाता येईल. एक मात्र खरे की, दिवाळी आता एक मोठा व्यावसायिक सण झाला आहे. मोठ्या प्रमाणात सवलती आणि ऑफर मिळतात, त्यामुळे हा सण आर्थिकदृष्ट्या व्यापारी क्षेत्रासाठी खूप महत्त्वाचा ठरला आहे.

---

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अजित पवारांचं 'येणार, येणार, येणारच'!

## आपला विजय पक्का असल्याचं विधान अजित पवार यांनी केलं

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने राज्यातील राजकीय घडामोडी वाढल्या असून जाहीर उमेदवारांनी जोरदार प्रचार सुरू केला आहे. माहीमसारख्या जागांवर युती किंवा आघाडीतल्या मित्रपक्षांमध्ये आपापसांतच मतभेदही दिसून येत आहेत. काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील, असे संकेत दोन्ही बाजूंनी देण्यात आले आहेत. कोणत्याही निवडणुकीत एकीकडे राजकीय घडामोडी घडत असताना दुसरीकडे खुमासदार चर्चाही रंगत असतात. अशीच एक चर्चा आता अजित पवारांच्या एका विधानावरून रंगू लागली आहे. कारण या चर्चेला संदर्भ जोडला जात आहे तो थेट देवेंद्र फडणवीसांच्या एका विधानाचा!**

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांनी बारामती विधानसभा मतदारसंघातून मोठा विजय मिळवला होता. पण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना बारामती लोकसभा मतदारसंघातून पराभवाचा सामना करावा लागला. विशेष म्हणजे, खुद्द अजित पवारांच्या बारामती विधानसभा मतदारसंघानं सुनेत्रा पवार यांना नाकारून सुप्रिया सुळे यांच्या पारड्यात आपलं मत टाकलं. याच मतदारसंघातून सुप्रिया सुळेंना सर्वाधिक मताधिक्य मिळालं. या पार्श्वभूमीवर बारामतीमधील यंदाची निवडणूक अजित पवारांसाठी महत्त्वाची ठरणार असून त्याचसंदर्भात अजित पवारांच्या या नव्या विधानाचे अर्थ लावले जात आहेत.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केलेलं एक भाषण बरंच प्रसिद्ध झालं होतं. त्यात देवेंद्र फडणवीसांनी "मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन" असं म्हणत निवडणुकीतील विजय पक्का असल्याचा दावा केला होता. पुढील प्रचारसभांमध्ये सातत्याने फडणवीसांनी याच उक्तीचा पुनरुच्चार केला. पक्षाच्या बॅनर्सवरही देवेंद्र फडणवीसांचं हेच विधान पाहायला मिळत होतं. २०१९च्या सत्तासंघर्षानंतर फडणवीस विरोधी पक्षनेते झाले आणि त्यांच्या याच विधानावरून टोलेबाजी होऊ लागली. आता अजित पवारांनीही तशाच स्वरुपाचं विधान केलं आहे. यावेळच्या निवडणुकीत आपला विजय पक्का असल्याचं विधान अजित पवार यांनी केलं आहे. बारामती मतदारसंघातील झारगरवाडीत प्रचारादरम्यान त्यांनी काही मतदारांशी संवाद साधला. बारामतीच्या विकासाच्या जोरावर विजयी होणार असल्याचा दावाही त्यांनी केला. "मागचं झालं गेलं गंगेला मिळालं. या निवडणुकीच्या निमित्ताने बारामती तालुक्याचा अधिक फायदा होण्याच्या दृष्टीने उद्या काहीही झालं तरी महायुतीचं सरकार येणार येणार येणार. सरकार स्थापन झाल्यानंतर आपल्याला तिथे चांगलं पद मिळणार मिळणार मिळणार", असं विधान अजित पवार यांनी केलं.अजित पवारांच्या या विधानाचा संदर्भ थेट देवेंद्र फडणवीसांच्या 'मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन' या विधानाशी लावला जात आहे. त्याच प्रकारचं अजित पवारांचं हे विधान असल्याचाही तर्क लावला जात आहे. या पार्श्वभूमीवर बारामतीमधील यंदाची निवडणूक चुरशीची आणि रंगतदार होण्याची शक्यता आहे. अजित पवारांच्या विरोधात बारामतीमधून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटानं युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली आहे.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांनी बारामती विधानसभा मतदारसंघातून मोठा विजय मिळवला होता. अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना बारामती लोकसभा मतदारसंघातून पराभवाचा सामना करावा लागला. विशेष म्हणजे, खुद्द अजित पवारांच्या बारामती विधानसभा मतदारसंघानं सुनेत्रा पवार यांना नाकारून सुप्रिया सुळे यांच्या पारड्यात आपलं मत टाकलं.

### सुप्रिया सुळेंना सर्वाधिक मताधिक्य

याच मतदारसंघातून सुप्रिया सुळेंना सर्वाधिक मताधिक्य मिळालं. या पार्श्वभूमीवर बारामतीमधील यंदाची निवडणूक अजित पवारांसाठी महत्त्वाची ठरणार असून त्याचसंदर्भात अजित पवारांच्या या नव्या विधानाचे अर्थ लावले जात आहेत.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केलेलं एक भाषण बरंच प्रसिद्ध झालं होतं. त्यात देवेंद्र फडणवीसांनी "मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन" असं म्हणत निवडणुकीतील विजय पक्का असल्याचा दावा केला होता. पुढील प्रचारसभांमध्ये सातत्याने फडणवीसांनी याच उक्तीचा पुनरुच्चार केला.

---

# त्यांच्या पक्षाची विचारधारा यामुळे स्पष्ट होतेय

## अपशब्द वापरल्याने शायना एन. सी. संतापल्या

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची रंगत चढत जातेय. आरोप-प्रत्यारोप अन् टीका-टिप्पण्यांना उत आलाय. दरम्यान, आपल्या उमेदवारांसाठी मतदारांना आकर्षित करण्याकरता विरोधकांबाबत अपशब्दही वापरले जात आहेत. भायखळा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अरविंद सावंत यांनी मुंबादेवी विधानसभा मतदारसंघाच्या शिवसेना (एकनाथ शिंदे) उमेदवार शायना एन. सी. यांच्याबाबत अपशब्द वापरला आहे.**

यावरून शायना एन. सी यांनीही त्यांना शाब्दिक चपराक लगावली आहे.मुंबादेवी मतदारसंघातून काँग्रेसच्या अमिन पटेल यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांचा प्रचार करण्याकरता अरविंद सावंत २९ ऑक्टोबर रोजी त्यांच्या मतदारसंघात गेले होते. शायना एन. सी याआधी वरळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्यास इच्छूक होत्या. परंतु, त्यांना मुंबादेवी मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली. याबाबत बोलताना अरविंद सावंत म्हणाले, "त्यांची अवस्था पहा. त्या आयुष्यभर भाजपात राहिल्या आणि आता शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षात आल्या. पण इथे इम्पोर्टेड चालत नाही. आमच्या इथे ओरिजनल माल चालतो."इम्पोर्टेड आणि ओरिजनल माल शब्द वापरल्याने शायना एन. सी यांनी संताप व्यक्त केला आहे. आज त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली.

### अरविंद सावंत काय म्हणाले?

या भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी अरविंद सावंत यांच्यावर वक्तव्याचा निषेध केला. यावेळी त्यांनी अरविंद सावंत यांच्या वक्तव्याची क्लिपही माध्यमांना ऐकवून दाखवली. त्या म्हणाल्या, "त्यांच्या पक्षाची विचारधारा यामुळे स्पष्ट होतेय. ते एका महिलेला माल म्हणतात. मी त्यांना विचारू इच्छिते की मुंबादेवीची प्रत्येक महिला माल आहे का? २०१९, २०१४ ला ते मोदींचं नाव लावून जिंकून आले आहेत. त्यांची सुरुवात तिथून झाली. आज २०२४ च्या निवडणुकीत ते मला माल म्हणतात. त्यांची मनस्थिती यामुळे स्पष्ट होते. त्यांच्या पक्षाचे नेतृत्त्व का गप्प आहेत?

# मोदींचा हलक्या दर्जाचा पीआर स्टंट

## मल्लिकार्जुन खरगेंची टीका; एक्सवरून दोघांमध्ये खटके

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**प्रत्यक्षात येऊ शकतात, अशीच आश्वासने द्या’, अशी सूचना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी कर्नाटकमधील काँग्रेस नेत्यांना दिली. यावरून आता पंतप्रधान मोदी आणि खरगे यांच्यात सोशल मीडियावरून खडाजंगी सुरू आहे. खरगेंच्या विधानाचा हवाला देऊन पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर टीका केली.**



“काँग्रेसचा खरा चेहरा उघड झाला आहे. त्यांच्याकडून कधीही पूर्ण न होणारी आश्वासने दिली जातात. हे आता लोकांसमोर उघड झाले आहे”, अशी टीका पंतप्रधान मोदींनी एक्सवरील पोस्टमध्ये केली. त्यानंतर खरगेंनीही एक्सवर पोस्ट करून या टीकेला उत्तर दिले. पंतप्रधान मोदींनी प्रसिद्धीसाठी हलक्या दर्जाचा पीआर स्टंट केल्याचे खरगे म्हणाले.मल्लिकार्जुन खरगेंनी स्वपक्षातील नेत्यांचे कान टोचल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ही संधी साधत काँग्रेसवर टीका केली. एक्सवर पोस्ट टाकत ते म्हणाले, “काँग्रेस पक्षाला आता कळून चुकले आहे की, अवाजवी आश्वासने देणे सोपे आहे, पण त्याची अंमलबजावणी करणे कठीण आहे. प्रत्येक निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेसकडून अवाजवी आश्वासने दिली जातात, काँग्रेसलाही माहितीये की, ही आश्वासने वास्तवात येणार नाहीत. काँग्रेस लोकांसमोर अतिशय वाईट पद्धतीने उघडी पडली आहे.”कर्नाटकमध्ये मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांच्यासह घेतलेल्या पत्रकार परिषदेत मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, “तुम्ही कर्नाटकात पाच गॅरंटी दिल्या. तुमच्याकडे पाहून आम्हीही पाच आश्वासने देऊ केली. आता तुम्ही यापैकी एक आश्वासन मागे घेणार असल्याचे मी वर्तमानपत्रात वाचले. तुम्ही वर्तमानपत्र वाचत नसाल. पण मी वाचतो.” याचाच आधार घेऊन पंतप्रधान मोदींनी म्हटले की, आज काँग्रेसची सत्ता असलेले कोणतेही राज्य बघा. हिमाचल प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणामधील विकासाचा वेग मंदावला आहे. आर्थिक स्थिती खालावली आहे. त्यांनी आश्वासने पूर्ण केलेली नाहीत. हा एकप्रकारे त्या राज्यातील जनतेचा विश्वासघात आहे. पंतप्रधान मोदींच्या हल्ल्यानंतर मल्लिकार्जुन खरगे यांनीही त्यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले, एनडीए सरकारने पहिल्या १०० दिवसांची जी योजना आखली होती. तो अतिशय हलक्या दर्जाचा पीआर स्टंट होता. एनडीए सरकार सर्वात खोटारडे, फसवणूक करणारे, लुटणारे आणि प्रसिद्धीसाठी हपापलेले सरकार आहे.मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, भाजपाच्या इंग्रजी आद्याक्षरातील बी म्हणजे बेट्रायल (विश्वासघात) आणि जे म्हणजे जुमला आहे. पंतप्रधान मोदींनी निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने आतापर्यंत सात वेळा पाळलेली नाहीत, अशीही आठवण खरगे यांनी करून दिली. अच्छे दिन, दोन कोटी रोजगार, विकसित भारत, ही आश्वासने फोल गेलेली आहेत.“काँग्रेसचा खरा चेहरा उघड झाला आहे. त्यांच्याकडून कधीही पूर्ण न होणारी आश्वासने दिली जातात. हे आता लोकांसमोर उघड झाले आहे”, अशी टीका पंतप्रधान मोदींनी एक्सवरील पोस्टमध्ये केली. त्यानंतर खरगेंनीही एक्सवर पोस्ट करून या टीकेला उत्तर दिले. पंतप्रधान मोदींनी प्रसिद्धीसाठी हलक्या दर्जाचा पीआर स्टंट केल्याचे खरगे म्हणाले.मल्लिकार्जुन खरगेंनी स्वपक्षातील नेत्यांचे कान टोचल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ही संधी साधत काँग्रेसवर टीका केली.

### विकासाचा वेग मंदावला आहे

एक्सवर पोस्ट टाकत ते म्हणाले, “काँग्रेस पक्षाला आता कळून चुकले आहे की, अवाजवी आश्वासने देणे सोपे आहे, पण त्याची अंमलबजावणी करणे कठीण आहे. प्रत्येक निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेसकडून अवाजवी आश्वासने दिली जातात, काँग्रेसलाही माहितीये की, ही आश्वासने वास्तवात येणार नाहीत. काँग्रेस लोकांसमोर अतिशय वाईट पद्धतीने उघडी पडली आहे.”कर्नाटकमध्ये मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांच्यासह घेतलेल्या पत्रकार परिषदेत मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, “तुम्ही कर्नाटकात पाच गॅरंटी दिल्या. तुमच्याकडे पाहून आम्हीही पाच आश्वासने देऊ केली. आता तुम्ही यापैकी एक आश्वासन मागे घेणार असल्याचे मी वर्तमानपत्रात वाचले. तुम्ही वर्तमानपत्र वाचत नसाल. पण मी वाचतो.” याचाच आधार घेऊन पंतप्रधान मोदींनी म्हटले की, आज काँग्रेसची सत्ता असलेले कोणतेही राज्य बघा. हिमाचल प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणामधील विकासाचा वेग मंदावला आहे.

---

# मोदी आमचे चांगले मित्र, हिंदूंचं संरक्षण करू

## दिवाळीच्या शुभेच्छा देताना डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आश्वासन!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अमेरिकेत मतदानाची तारीख जवळ आलेली असताना आता अमेरिकेत स्थायिक झालेल्या परदेशी नागरिकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. दिवाळीच्या निमित्ताने अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीयांना शुभेच्छा देऊन भारत आणि अमेरिकेतली भागीदारी अधिक मजबूत करण्याचे आश्वासित केले. त्यांनी एक्स पोस्टवरून भारतीयांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.**



“हिंदू, ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याकांवरील रानटी हिंसाचाराचा मी तीव्र निषेध करतो. त्यांच्यावर जमावाकडून हल्ले होत आहेत आणि बांगलादेशमध्ये लूट केली जात आहे, यामुळे अराजकता निर्माण झाली आहे. हे माझ्या काळात कधीच घडले नसते. कमला आणि जो यांनी जगभरातील आणि अमेरिकेतील हिंदूंकडे दुर्लक्ष केले आहे. इस्रायल ते युक्रेन आणि आमच्या स्वतःच्या दक्षिण सीमेपर्यंत आपत्ती ठरले आहेत, परंतु आम्ही अमेरिकेला पुन्हा मजबूत बनवू आणि सामर्थ्याने शांतता परत आणू!” असं आश्वासन डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीयांना दिलं. कट्टरपंथी डाव्यांच्या धर्मविरोधी अजेंड्यापासून आम्ही हिंदू अमेरिकनांचेही संरक्षण करू. आम्ही तुमच्या स्वातंत्र्यासाठी लढू. माझ्या प्रशासनात, आम्ही भारत आणि माझे चांगले मित्र पंतप्रधान मोदी यांच्याशी आमची उत्तम भागीदारी मजबूत करू. कमला हॅरिस तुमचे छोटे व्यवसाय अधिक नियम आणि उच्च करांसह नष्ट करतील. याउलट, मी कर कमी केले, नियमात कपात केली.

### अत्यंत अटीतटीची लढाई सुरु आहे

आणि इतिहासातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था तयार केली. आम्ही ते पुन्हा करू, पूर्वीपेक्षा मोठे आणि चांगले करू. आम्ही अमेरिकेला पुन्हा ग्रेट बनवू”, असंही ते म्हणाले.“तसेच सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा. मला आशा आहे की प्रकाशाचा सण वाईटावर चांगल्याचा विजय मिळवून देईल!” अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.५ नोव्हेंबर रोजी अमेरिकेमध्ये अध्यक्षीय निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. विद्यमान उपाध्यक्ष कमला हॅरीस आणि माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात अत्यंत अटीतटीची लढाई सुरू आहे.

# विकी कौशल 'तौबा तौबा' गाण्यामुळे चर्चेत!



बॉलीवूडचे कलाकार सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटातील भूमिकांमुळे, तर कधी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे हे कलाकार मोठ्या चर्चेत असतात. आता बॉलीवूड अभिनेता विकी कौशल त्याच्या नवीन चित्रपटामुळे मोठ्या चर्चेत आहे. 'बॅड न्यूज' असे या नवीन चित्रपटाचे नाव असून, त्यातील 'तौबा तौबा' गाण्यामुळे तो चर्चेत आला आहे.विकी कौशलचा 'बॅड न्यूज' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता या चित्रपटातील 'तौबा तौबा' गाणे चाहत्यांना ताल धरण्यासाठी भाग पाडत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. नॅशनल क्रश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अभिनेत्री तृप्ती डिमरी या गाण्यात विकीला साथ देताना दिसत आहे. मात्र, विकीने आपल्या सहजसुंदर नृत्याद्वारे प्रेक्षकांना त्याच्यावर लक्ष खिळवून ठेवायला भाग पाडले आहे. सोशल मीडियावर आता विकीच्या या डान्सने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करायला सुरुवात केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# नीनाजींच्या लूकपुढे दीपिकाही फिकी!

बॉलीवूडची सुपरहॉट अभिनेत्री नीना गुप्ता हे नाव मनोरंजन विश्वातलं कायम चर्चेतलं आणि तितकचं लोकप्रिय नाव आहे. नीना या नेहमी चर्चेत असतात. मग ते वैयक्तिक कारणामुळे असो किंवा त्याच्या व्यावसायिक कारणाने. नीना यांच्या वक्तव्याची ही बरीच चर्चा होत असते. काही दिवसांपुर्वी नीना यांचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला होता. त्या परदेशी फिरायला गेल्या होत्या. पती विवेक मेहरासोबत फ्रान्समध्ये सुट्टीचा आनंद घेत होते. नीना गुप्ता त्यांच्या ग्लॅमरस अवतारामुळे लाईमलाईटमध्ये राहतात. यावेळीही तसचं काहीतरी झालं. सध्या सोशल मिडियावर त्यांचा व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत आहे. या व्हिडिओत त्यांनी शॉर्ट्स आणि हाय बूट घालून लूक पुर्ण केला आहे. त्याच्या या लूकची सोशल मीडियावर खुपच चर्चा आहे. पापाराझींनी त्यांचा हा व्हिडिओ शेयर केला आहे. व्हिडिओमध्ये नीना काळ्या रंगाच्या मिनी ड्रेसमध्ये आणि उंच बूट आणि मॅचिंग पर्सही घेतली होती. साधा ब्राऊन शेड्सने त्यांनी त्यांचा स्टायलिश लुक कॅरी केला. नीना नुकत्याच 'लस्ट स्टोरीज' आणि 'ट्रायल पिरीएड' मुळे चर्चेत होत्या. 'ट्रायल पिरीएड' या वेब सिरिजची सक्सेस पार्टी झाली त्यासाठी नीना आल्या होत्या. नीना वयाच्या ६४ व्या वर्षीही इतक्या फिट आहेत.

# शिल्पाचा झुमका

शिल्पा शेट्टीने तिचा एक डान्स व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे, ज्यामध्ये ती रॉकी आणि राणीच्या प्रेमकथेतील 'व्हॉट झुमका' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. करण जोहरच्या या चित्रपटात रणवीर सिंह आणि आलिया भट्ट मुख्य भूमिकेत आहेत. शिल्पाच्या या व्हिडिओमध्ये ती गुलाबी सलवार सूटमध्ये दिसत आहे. यासोबत तिने सोनेरी आणि गुलाबी रंगाचा झुमका आणि सोनेरी बांगड्या घातल्या आहेत, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत आहे. शिल्पाने हा व्हिडिओ चित्रपटाचा दिग्दर्शक करण जोहरला समर्पित केला आहे. व्हिडिओ शेअर करताना अभिनेत्रीने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'हे तुमच्यासाठी आहे करण जोहर. जब आप #झुमका पहन रहे हों, तब तो जरूर बनता है ठुमका। हालांकि, @MANISHMALHOTRA05 की साड़ी याद आ रही है' शिल्पाचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप पसंत केला जात आहे. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'सुपरर से भी ऊपर'. दुसऱ्याने लिहिले, 'परफेक्ट'. तिसऱ्या यूजरने शिल्पाचे कौतुक करत लिहिले, 'तू खूप सुंदर दिसत आहेस. शिल्पा शेट्टी लवकरच रोहित शेट्टीच्या इंडियन पोलिस फोर्स या वेबसिरीजमध्ये ॲक्शन अवतारात दिसणार आहे. या वेब सीरिजमध्ये त्याच्यासोबत सिद्धार्थ मल्होत्रा आणि विवेक ओबेरॉय हे देखील मुख्य भूमिकेत आहेत. याशिवाय शिल्पाने 'केडी - द डेव्हिल' देखील साइन केले आहे, ज्यामध्ये ती सत्यवतीची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटात ध्रुव सर्जा, शिल्पा शेट्टी, व्ही रविचंद्रन आणि संजय दत्त यांच्याही भूमिका आहेत.



# रणवीर आईच्या पाया पडला

फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांनी काल रात्री मुंबईत एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रणवीर सिंग आणि आलिया भट्ट 'द ब्राइडल कॉउचर' शोमध्ये शोस्टॉपर बनले. रणवीरची पत्नी आणि अभिनेत्री दीपिका पदुकोणही रणवीरची आई अंजू भवनानीसोबत शोमध्ये सहभागी झाली होती. यादरम्यान अभिनेता रॅम्प वॉकदरम्यान थांबला आणि त्याने पत्नी दीपिकाच्या जवळ जात तिच्या गालाचे चुंबन घेतले आणि आईच्या पाया पडत दर्शन घेतले. दीपिका, जान्हवी कपूर, खुशी कपूर, काजोल आणि करण जोहरसह अनेक दिग्गज कलाकार या कार्यक्रमाला उपस्थित होते. व्हिडिओमध्ये रणवीर सिंग शेरवानी आणि ग्लिटरिंग जॅकेटमध्ये रॅम्प वॉक करत होता. दरम्यान, तो अचानक थांबला आणि दीपिकाजवळ गेला आणि तिच्या गालावर किस केला. यानंतर रणवीर आईच्या पायाला स्पर्श करून आशीर्वाद घेताना दिसला. त्यानंतर त्याने पुन्हा रॅम्प वॉक सुरू केला. या व्हिडिओला सोशल मीडियावर खूप पसंती दिली जात आहे.

# जावेद अख्तर यांची प्रेमकहाणीची



बॉलीवूडचे कलाकार हे सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटातील भूमिकांमुळे, कधी सोशल मीडियावरील पोस्टमुळे, तर कधी मुलाखतींदरम्यान केलेल्या वक्तव्यांमुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. आता दिग्गज अभिनेत्री शबाना आजमी आपल्या वक्तव्यामुळे चर्चांचा भाग बनल्या आहेत. अरबाज खानच्या 'द इनव्हिन्सिबल्स' कार्यक्रमात आपल्या खासगी आयुष्याबद्दल त्यांनी अनेक खुलासे केले आहेत.जावेद अख्तर आणि शबाना आजमी यांची प्रेमकहाणी आजही चाहत्यांसाठी उत्सुकतेचा विषय असल्याचे पाहायला मिळते. कारण- जेव्हा या जोडीने लग्न केले त्यावेळी जावेद अख्तर यांचे लग्न झाले होते आणि त्यांना त्या लग्नापासून झोया व फरहान, अशी दोन मुले आहेत. शबाना आजमी आणि जावेद अख्तर यांनी ९ डिसेंबर १९८४ ला लग्नगाठ बांधली. आता शबाना आजमी या जावेद अख्तर यांच्या प्रेमात कशा पडल्या आणि त्याआधी जावेद अख्तरबद्दल त्या काय विचार करायच्या याबद्दल त्यांनी खुलासा केला आहे.जावेद अख्तर यांच्याबद्दल बोलताना शबाना आजमी म्हणतात, "आमच्या दोघांच्या घरची पार्श्वभूमीदेखील सारखीच आहे. आमच्या दोघांचे वडील समाजवादी आणि गीतरचनाकार आहेत. सुरुवातीच्या काळात मी जावेदला टाळायचे. जावेदने कविता लिहायला सुरुवात केली होती आणि त्या कविता माझ्या वडिलांना दाखविण्यासाठी, त्यावर प्रतिक्रिया घेण्यासाठी तो माझ्या घरी यायचा. माझे वडील कैफी आजमी हे प्रसिद्ध उर्दू कवी होते, त्यांना भेटण्यासाठी जावेद घरी यायचा. पण, मी जावेद आणि सलीम अली यांच्या रागाबद्दल ऐकून होते. त्यामुळे या दोघांपासून मी दूरच राहायचे. सुरुवातीला मी त्यांच्याकडे फारसं लक्ष दिलं नाही. १९८० ला माझा 'स्पर्श' हा चित्रपट आला होता. त्यावेळी त्यानं खूप कौतुक केलं होतं. तो घरी आला आणि चित्रपटातल्या सर्व कलाकारांनी बोलावलं. त्याला चित्रपटातील प्रत्येक संवाद माहीत होता आणि प्रत्येक डायलॉग पाठदेखील होता.

# कोहलीचा आत्मघातकी रनआऊट!

## टीम इंडियाने अवघ्या 86 धावांत 4 विकेट्स गमावल्या

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसरा आणि शेवटचा सामना आजपासून मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जात आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदरच्या बळावर न्यूझीलंडला २३५ धावांत गुंडाळले. यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या टीम इंडियाने अवघ्या ८६ धावांत ४ विकेट्स गमावल्या. रोहित शर्मा, यशस्वी जैस्वाल, मोहम्मद सिराज आणि विराट कोहली बाद झाले आहेत. यापैकी विराट कोहली ज्या प्रकारे रनआऊट झाला, ते आत्मघातकी होते, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**




विराट कोहलीसाठी न्यूझीलंडविरुद्धची मायदेशात खेळली जाणारी कसोटी मालिका एखाद्या वाईट स्वप्नापेक्षा कमी नाही. कारण संपूर्ण मालिकेत विराट कोहलीला अपयशाचा सामना करावा लागत आहे. बंगळुरू आणि पुणे कसोटीनंतर आता मुंबई कसोटीत त्याच्यासोबत असेच काहीसे घडले, जे पाहून त्याच्या चाहत्यांना विश्वास बसणार नाही. मुंबई कसोटीच्या पहिल्या डावात अवघ्या ४ धावांवर विराट कोहली रनआऊट झाला. महत्वाची गोष्ट म्हणजे रनआऊट होण्यात विराट कोहलीचीच चूक होती.भारताच्या पहिल्या डावाच्या १९व्या षटकात विराट कोहलीची विकेट पडली. रचिन रवींद्रच्या तिसऱ्या चेंडूवर विराट कोहलीने मिड-ऑन दिशेने शॉट खेळून एक धाव चोरण्याचा प्रयत्न केला, पण हेन्रीने एका हाताने चेंडू पकडला आणि तो थेट स्टंपवर आदळला आणि विराट रनआऊट झाला. विराट कोहलीनेही डायव्हिंग केले पण तो क्रीजच्या आत पोहोचू शकला नाही. विराट कोहली कसोटी कारकिर्दीत चौथ्यांदा रनआऊट झाला.भारतीय संघाने कर्णधार रोहित शर्माची विकेट लवकर गमावली होती. रोहित शर्मा केवळ १८ धावा करून बाद झाला. मात्र यानंतर शुबमन गिल आणि यशस्वी जैस्वाल यांनी अर्धशतकी भागीदारी करत संघाला ताब्यात घेतले. पण त्यानंतर १८ व्या षटकापासून भारतीय संघाच्या फलंदाजांची निराशाजनक कामगिरी सुरू झाली. संघाची धावसंख्या ७८ धावा असताना यशस्वी जैस्वाल रिव्हर्स स्वीप खेळून बाद झाला. यानंतर टीम इंडियाने सिराजला नाईट वॉचमन म्हणून पाठवले आणि तो पहिल्याच चेंडूवर बाद झाला. विराट कोहलीनेही वैयक्तिक ४ धावांवर आपली विकेट फेकली. टीम इंडियासाठी पहिला दिवस चांगला जाऊ शकला असता पण ६ धावांच्या आत सर्व काही बदलले.विराट कोहलीसाठी न्यूझीलंडविरुद्धची मायदेशात खेळली जाणारी कसोटी मालिका एखाद्या वाईट स्वप्नापेक्षा कमी नाही. कारण संपूर्ण मालिकेत विराट कोहलीला अपयशाचा सामना करावा लागत आहे. बंगळुरू आणि पुणे कसोटीनंतर आता मुंबई कसोटीत त्याच्यासोबत असेच काहीसे घडले, जे पाहून त्याच्या चाहत्यांना विश्वास बसणार नाही. मुंबई कसोटीच्या पहिल्या डावात अवघ्या ४ धावांवर विराट कोहली रनआऊट झाला. महत्वाची गोष्ट म्हणजे रनआऊट होण्यात विराट कोहलीचीच चूक होती.भारताच्या पहिल्या डावाच्या १९व्या षटकात विराट कोहलीची विकेट पडली. रचिन रवींद्रच्या तिसऱ्या चेंडूवर विराट कोहलीने मिड-ऑन दिशेने शॉट खेळून एक धाव चोरण्याचा प्रयत्न केला, पण हेन्रीने एका हाताने चेंडू पकडला आणि तो थेट स्टंपवर आदळला आणि विराट रनआऊट झाला. विराट कोहलीनेही डायव्हिंग केले पण तो क्रीजच्या आत पोहोचू शकला नाही. विराट कोहली कसोटी कारकिर्दीत चौथ्यांदा रनआऊट झाला.भारतीय संघाने कर्णधार रोहित शर्माची विकेट लवकर गमावली होती. रोहित शर्मा केवळ १८ धावा करून बाद झाला. मात्र यानंतर शुबमन गिल आणि यशस्वी जैस्वाल यांनी अर्धशतकी भागीदारी करत संघाला ताब्यात घेतले. पण त्यानंतर १८ व्या षटकापासून भारतीय संघाच्या फलंदाजांची निराशाजनक कामगिरी सुरू झाली. संघाची धावसंख्या ७८ धावा असताना यशस्वी जैस्वाल रिव्हर्स स्वीप खेळून बाद झाला. यानंतर टीम इंडियाने सिराजला नाईट वॉचमन म्हणून पाठवले.

### न्यूझीलंडला 235 धावांत गुंडाळले

आणि तो पहिल्याच चेंडूवर बाद झाला. विराट कोहलीनेही वैयक्तिक ४ धावांवर आपली विकेट फेकली. टीम इंडियासाठी पहिला दिवस चांगला जाऊ शकला असता पण ६ धावांच्या आत सर्व काही बदलले.भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसरा आणि शेवटचा सामना आजपासून मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जात आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदरच्या बळावर न्यूझीलंडला २३५ धावांत गुंडाळले. यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या टीम इंडियाने अवघ्या ८६ धावांत ४ विकेट्स गमावल्या.

# केकेआरला लिलावापूर्वी बसला मोठा फटका

## तिजोरीतून वजा होणार 12 कोटी रुपये, नेमकं काय आहे?

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएलचा १८वा हंगाम २०२५ मध्ये खेळवला जाणार आहे, पण त्याआधी खेळाडूंचा मोठा लिलाव पार पडणार आहे. ज्यासाठी सर्व फ्रँचायझींनी त्यांच्या कायम ठेवलेल्या खेळाडूंची नावे जाहीर केली आहेत. यामध्ये आयपीएल २०२४ ची ट्रॉफी जिंकणाऱ्या कोलकाता नाइट रायडर्स संघाने एकूण ६ खेळाडूंना कायम ठेवण्यासाठी आपल्या १२० कोटीच्या पर्समधून १७ कोटी रुपये खर्च केले.**




परंतु आता त्यांच्या पर्समधून १२ कोटी रुपये अधिक कापले गेले आहेत, यामागे आयपीएल गव्हर्निंग कांउसिलचा मोठा नियम कारणीभूत ठरला आहे. तो काय नियम आहे? जाणून घेऊया. आयपीएल २०२५ च्या मेगा ऑक्शनपूर्वी कोलकाता नाईट रायडर्स संघाने रिंकू सिंगला १३ कोटी रुपयांमध्ये कायम ठेवले, तर त्यांनी वरुण चक्रवर्ती, सुनील नरेन आणि आंद्रे रसेल यांना प्रत्येकी १२ कोटी रुपयांना कायम ठेवले आहे. तसेच हर्षित राणा आणि रमणदीप सिंग यांना प्रत्येकी ४ कोटी रुपयांमध्ये अनकॅप्ड खेळाडू म्हणून कायम ठेवले. अशा प्रकारे ६ खेळाडूंना कायम ठेवण्यासाठी केकेआरने एकूण ५७ कोटी रुपये खर्च केले असताना, प्रत्येक स्लॉटसाठी एक रक्कम आयपीएल गव्हर्निंग काउंसिलने आधीच निश्चित केली होती. ज्यामुळे त्यांना १२ कोटींचा फटका बसला आहे.रिटेन करण्यात येणाऱ्या खेळाडूंसाठी आयपीएल गव्हर्निंग कांउसिलने निश्चित केलेल्या रुपयांपेक्षा कमी पैसे दिल्यास, उर्वरित पैसे फ्रँचायझीच्या पर्समधून कापले जाातात. नेमके तेच केकेआर फ्रँचायझीच्या बाबतीत घडले आहे.

### रिटेन केलेल्या खेळाडूला 18 कोटी

आयपीएलच्या नियमांनुसार, पहिल्या रिटेन केलेल्या खेळाडूला १८ कोटी द्यावे लागतात. परंतु केकेआरने या नियमाचा भंग केल्याने त्यांच्या पर्समधून ५ कोटी रुपये कापले गेले. तसेच वरुण चक्रवर्तीलाही दोन कोटी रुपये कमी दिले आहेत.तिसरा रिटेन खेळाडू म्हणून केकेआरने सुनील नरेनला १२ कोटी रुपये दिले, ज्यात त्यांनी आयपीएलने निश्चित केलेल्या रक्कमेपेक्षा १ कोटी रुपये जास्त खर्च केले. तसेच चौथ्या रिटेन केलेल्या खेळाडूला १८ कोटी रुपये द्यायला हवे होते.